
# प्रकरण २ : पैसा

**प्रस्तावना :**

मानव हा बुद्धिमान प्राणी आहे. पैशाचा शोध हा जगातील अनेक महत्वपूर्ण व मूलभूत शोधांपैकी एक आहे. क्राऊथर यांच्या मते ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत काही मूलभूत संशोधन असते. उदा. विज्ञानात अग्नीचा शोध, यांत्रिक शास्त्रात चाकांचा शोध इत्यादी. पैशाचा शोध हा असाच एक महत्वपूर्ण शोध असून, त्याने मानवाच्या आर्थिक आयुष्यात क्रांतिकारी बदल घडवून आणला आहे. पैशांद्वारे विविध वस्तू व सेवांची खरेदी-विक्री करता येते. पैशामुळे गरजांचे समाधान होते. आधुनिक अर्थव्यवस्था पैशावर अवलंबून आहे. दैनंदिन व्यवहारात पैसा हा वस्तुविनिमयातील समस्या दूर करतो.



आकृती २.१ वस्तुविनिमय




**वस्तुविनिमय :** वस्तूच्या बदल्यात वस्तू देणे-घेणे म्हणजे वस्तू विनिमय होय.

**वस्तुविनिमयातील अडचणी :**

१) **गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभाव :** वस्तुविनिमय व्यवस्थेची मुख्य मर्यादा म्हणजे गरजांच्या दुहेरी संयोगाचा अभाव होय. उदा. 'अ' व्यक्तीकडे कापड आहे त्याबदल्यात त्याला तांदूळ हवा आहे. 'ब' व्यक्तीकडे तांदूळ आहे पण त्याला 'अ' व्यक्तीकडून कापड नको आहे यामध्ये दुहेरी संयोगाचा अभाव असल्याने वस्तूविनिमय शक्य नाही.

२) **मूल्याच्या सामायिक मापदंडाचा अभाव :** वस्तुविनिमय पद्धतीत वस्तूचे मूल्य मोजण्यासाठी प्रमाणित मापकाचा अभाव होता. उदा. दोन लीटर दुधाची तुलना दोन किलो तांदळाबरोबर करता येत नाही.

३) **वस्तूंचा साठा करण्यातील अडचण :** भविष्याच्या उपभोगासाठी वस्तू साठवणे गरजेचे असते. परंतु नाशवंत वस्तूंचा साठा करणे अवघड होते. उदा. दूध, अंडी, मासे, भाजीपाला इत्यादी, तसेच जागेच्या अभावामुळे अवजड वस्तू साठवणे कठीण होते.

४) **वस्तूच्या विभाज्यतेची अडचण :** प्राणी, घर इत्यादींचे छोट्या भागात विभाजन करणे गैरसोयीचे होते, त्यामुळे एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशी विनिमय करणे अवघड होते. उदा. 'अ' या व्यक्तीकडे गव्हाचे पोते आहे. त्याला विनिमयात शेळी हवी आहे. 'ब' या व्यक्तीकडे शेळी आहे, त्याला गव्हाचे अर्धेच पोते हवे आहे. अशा वेळेस गव्हाचे अर्धे पोते असे विभाजन करणे शक्य आहे, परंतु जिवंत शेळीचे विभाजन करणे शक्य नाही. विभाज्यतेची अडचण निर्माण झाल्यामुळे विनिमय होऊ शकत नाही.

५) **विलंबित देणी देण्यातील अडचण :** विलंबित देणी म्हणजे भविष्यातील देणी व कर्जाची परतफेड होय, परंतु वस्तू विनिमयात वस्तूरूपाने कर्ज परत करणे हे अवघड होते.

उदा. भविष्यात नाशवंत वस्तूंची त्याच स्वरूपात परतफेड करणे अवघड होते.

**पैशाची व्याख्या :**

१) **प्रा. क्राऊथर :** ''जी वस्तू विनिमय माध्यम म्हणून सर्वसाधारणपणे स्वीकार्य असते आणि त्याचबरोबर जी वस्तू मूल्यमापनाचे व मूल्यसंचयनाचे कार्य करते अशी कोणतीही वस्तू म्हणजे पैसा''.

२) **प्रा. वॉकर :** ''जो पैशाची कार्ये करतो तो पैसा होय''.

**पैशाची उत्क्रांती :** 'पैसा' अस्तित्वात येण्याचे कारण 'उत्क्रांती' आहे 'क्रांती' नव्हे. पैशाचे स्वरूप काळाची गरज व संस्कृतीचा विकास यांनुसार सतत बदलले आहे.

८) इलेक्ट्रॉनिक पैसा
७) प्लॅस्टिक पैसा
६) पत पैसा
५) कागदी पैसा
४) धातूची नाणी
३) धातू पैसा
२) वस्तू पैसा
१) पशू पैसा

आजच्या आधुनिक काळात वापरल्या जाणाऱ्या पैशाचे स्वरूप हा काळाप्रमाणे झालेल्या बदलांचा परिणाम आहे.

पैशाच्या उत्क्रांतीनुसार चलनाचे विविध प्रकार खालीलप्रमाणे आहेत. (आकृती २.२)



आकृती २.२
पैशांची उत्क्रांती

**पैशाचे प्रकार :**

१) **पशू पैसा :** इतिहास पूर्वकाळात देवाणघेवाणीचे माध्यम म्हणून पशूपैसा वापरला जात होता. उदा. गायी, शेळ्या, मेंढ्या इत्यादी. परंतु विभाजनाच्या अडचणीमुळे वस्तू पैसा अस्तित्वात आला.

२) **वस्तू पैसा :** जुन्या काळात ज्या वस्तू पैसा देवाणघेवाणीचे माध्यम म्हणून वापरल्या जात होत्या त्या हवामानाची स्थिती व संस्कृती यांवर अवलंबून होत्या. उदा. प्राण्यांची कातडी, धान्य, शिंपले, पीसे, हस्तिदंत, मीठ, दगड व दुर्मिळ वस्तू हे विनिमयाचे माध्यम म्हणून वापरले जात होते, परंतु वस्तूंचा साठा करण्याच्या अडचणीमुळे धातू पैसा अस्तित्वात आला.

३) **धातू पैसा :** धातू पैसा तयार करताना सोने, चांदी, तांबे, ॲल्युमिनिअम, निकेल इत्यादी धातूंचा वापर केला जात होता. परंतु मौल्यवान धातू व धातूंच्या तुकड्यातील समानतेच्या अभावामुळे धातूंच्या नाण्यांचा शोध लागला.

४) **धातूंची नाणी :** पूर्वीच्या काळी विविध राज्यांचे राजे त्यांची मुद्रा असलेली नाणी बनवत असत. काळपरत्वे शासकीय धोरणानुसार मौद्रीक नाण्यांमध्ये एकवाक्यता व कायदेशीर स्थिरता आणण्याच्या उद्देशाने प्रणाली निश्चित केली गेली. नाण्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे–

**अ) प्रमाणित किंवा प्रधान नाणी :** प्रमाणित नाणी म्हणजे ज्यांचे दर्शनी मूल्य व अंतरिक मूल्य सारखे असते. अधिकृत यंत्रणेद्वारे दर्शनी मूल्याचे विनीमय मूल्य निश्चित केले जाते. ही नाणी सोने, चांदी, इत्यादी धातूंपासून बनविलेली असतात. ब्रिटिश कालखंडात काही दिवस प्रमाणित नाणी वापरली जात होती.

**ब) गौण नाणी किंवा लाक्षणिक नाणी :** लाक्षणिक नाणी म्हणजे ज्यांचे दर्शनी मूल्य हे अंतरिक

मूल्यापेक्षा जास्त असते. ही नाणी ॲल्युमिनिअम, निकेल यांसारख्या कमी दर्जाच्या धातूपासून बनविलेली असतात. भारताच्या चलनातील सर्व नाणी लाक्षणिक किंवा गौण नाणी आहेत. गौण नाणी ही कमी मूल्याची असल्याने तुलनेने कमी रकमेच्या व्यवहारांमध्ये वापरली जातात. गौण नाण्यांच्या वहनियतेच्या अडचणीमुळे कागदी पैसा अस्तित्वात आला.

५) **कागदी पैसा :** कागदी पैसा हा धातूच्या पैशाला पर्याय आहे. भारतात नोटा चलनात आणण्याचा एकाधिकार मध्यवर्ती बँकेकडे आहे. भारत सरकार व मध्यवर्ती बँकेकडून अंमलात आणलेल्या कागदी चलनाचा समावेश कागदी पैशात होतो.

भारतामध्ये एक रुपयाची नोट व सर्व प्रकारची नाणी भारत सरकारकडून चलनात आणली जातात व त्यापुढील चलनाच्या निर्मितीचे अधिकार मध्यवर्ती बँकेकडे (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) आहेत. कागदी पैसा हाताळण्यातील गैरसोय व पैसा साठवण्यातील जोखीम या कारणांमुळे बँक पैसा अस्तित्वात आला.

६) **पतपैसा किंवा बँक पैसा :** पतपैसा म्हणजे बँक पैसा होय. बँका लोकांकडून ठेवलेल्या ठेवींच्या आधारे पतपैसा निर्माण करतात. त्याचा वापर पतपैसा निर्मितीसाठी केला जातो. हा केव्हाही काढता येतो, किंवा ज्याचे दुसऱ्या व्यक्तीकडे धनादेश, धनाकर्ष इत्यादीच्या साहाय्याने हस्तांतरण करता येते. हा धनादेश, धनाकर्ष इत्यादी पैशासारखे कार्य करतो. परंतु पैसा नव्हे, तर ठेवी हस्तांतरित करण्याचे पतसाधन आहे. पतपैसा देशाच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडतो. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात पैसाविरहित देवाणघेवाण अधिक महत्त्वाची असल्याने प्लॅस्टिक पैसा अस्तित्वात आला.

७) **प्लॅस्टिक पैसा :** प्लॅस्टिक पैसा वापरणे आधुनिक तंत्रज्ञानामुळे सोपे झाले आहे. डेबिट व क्रेडिट कार्डस प्लॅस्टिक पैसा म्हणून वापरले जातात. नवनवीन शोधाचे पुढचे पाऊल म्हणजेच इलेक्ट्रॉनिक पैसा होय.

**शोधा पाहू :**

प्लॅस्टिक पैशाच्या सुरक्षित वापरासाठी केलेल्या नवीन सुधारणा.

८) **इलेक्ट्रॉनिक पैसा :** इ-पैसा किंवा इलेक्ट्रॉनिक पैशाला मौद्रीक मूल्य असून ते इलेक्ट्रॉनिक यंत्रणेच्या साहाय्याने हस्तांतरित केले जाते. उदा. मोबाईल फोन, टॅब्लेट, स्मार्ट कार्ड्स, संगणक इत्यादी. इलेक्ट्रॉनिक पैशाला मध्यवर्ती बँकेचे पाठबळ असते. इलेक्ट्रॉनिक पैसा जागतिक व्यवहारामध्ये वापरला जातो. अंका त्मक किंवा संगणकीय पाकीट (Digital wallets) हा देखील साठविलेल्या इलेक्ट्रॉनिक पैशाचा प्रकार आहे.

**शोधा पाहू :**

अंकीय (डिजिटल) देवाणघेवाण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध साधनांची यादी तयार करा.

**तुम्हांला माहीत हवं :**

**अ) विधिग्राह्य पैसा :** या पैशाला कायद्याचे पाठबळ असल्यामुळे कोणत्याही व्यवहारात स्वीकारला जातो. भारतातील सर्व नाणी व चलनी नोटा इत्यादी.

**ब) अविधिग्राह्य पैसा :** हा पैसा लोक अंतिम देवाणघेवाण करण्यासाठी वापरतात. कोणतेही कायदेशीर पाठबळ नसल्याने हा पैसा नाकारता येतो. याला पर्यायी पैसा किंवा ऐच्छिक पैसा असेही म्हणतात. धनादेश, विनिमय पत्रे इत्यादी.

## पैशाचे गुणधर्म :

१) **सार्वत्रिक स्वीकार्यता :** पैसा या वस्तूमध्ये सार्वत्रिक स्वीकार्यता हा गुणधर्म असल्याने तो विनिमयाचे माध्यम म्हणून वापरला जातो.

२) **विभाज्यता :** छोट्या व्यवहारामध्ये पैशाचे छोट्या मूल्यात विभाजन करणे सोपे जाते.

३) **टिकाऊपणा :** पैशाच्या अंगी टिकाऊपणा हा गुणधर्म असल्याने चलनी नोटा व नाणे दीर्घकाळात पुन्हा पुन्हा वापरता येतात.

४) **सुज्ञेयता :** पैसा ही वस्तू सुलभतेने ओळखता येते. देवाणघेवाण करणाऱ्या व्यक्तीकडून निर्माण होणारी संदिग्धता टाळता येते.

५) **वहनीयता :** एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजगत्या, सोयीनुसार वाहून नेता येते. उदा. चलनी नोटा.

६) **एकजिनसीपणा :** एखाद्या विशिष्ट परिमाणाचे पैसे गुणवैशिष्ट्यांमुळे एक जिनसी दिसतात.

७) **स्थिरता :** पैशाला स्थिर मौद्रिक मूल्य आहे. ते वस्तू व सेवांचे विनिमय मूल्य मोजण्यासाठी वापरतात. या वस्तूंची देवाणघेवाण भविष्यातील गरजांनुसार केली जाते.

**पैशाची कार्ये :**

**अ) प्राथमिक कार्ये :**

१) **विनिमयाचे माध्यम :** पैशाचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे विनियमाचे माध्यम होय. पैशाच्या आधारे वस्तूची खरेदी विक्री केली जाते.

२) **मूल्यमापनाचे साधन किंवा हिशोबाचे परिमाण :** वस्तू व सेवांची किंमत पैशात व्यक्त केली जाते. पैशामुळे वस्तूंच्या किंमतीची तुलना करता येते. विविध चलनांद्वारे विविध देशांतील वस्तूंचे मूल्य व्यक्त करता येते. उदा. भारतातील रुपया, संयुक्त अमेरिकेच्या संस्थानामधील डॉलर, युनायटेड किंगडमचे पौंड, जपानचे येन इत्यादी. तसेच सर्व प्रकारचे उत्पन्न, खर्च, मालमत्ता, देणी पैशाच्या स्वरूपात व्यक्त करता येतात.

**ब) दुय्यम कार्ये :**

१) **विलंबित देणी देण्याचे साधन :** वस्तुविनिमय व्यवस्थेत कर्ज घेणे सोपे होते पण त्याची परतफेड करणे अवघड होते. उदा. धान्य, गुरे या स्वरूपातील कर्ज. जी देणी भविष्यात द्यावी लागतात त्याला विलंबित देणी असे म्हणतात. पैसा हे देणी देण्याचे साधन आहे. पैशांमुळे कर्ज देणे व कर्ज घेणे सोपे जाते. पैशाने ही समस्या सोडविली आहे.

२) **मूल्यसंचयनाचे साधन :** पैसा मूल्यसंचयनाचे कार्य करतो. पैसा वर्तमानकाळातील गरजांची पूर्तता करण्याबरोबरच भविष्यकाळातील गरजांची पूर्तता करण्यासाठी वापरला जातो. हे बचतीमुळे शक्य होते. लॉर्ड. जे. एम केन्स यांच्या मते ''पैसा वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्यातील दुवा आहे''.

३) **मूल्य हस्तांतरणाचे साधन :** पैशामुळे एका व्यक्तींकडून दुसऱ्या व्यक्तीकडे व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मूल्याचे हस्तांतरण केले जाते. स्थावर मालमत्ता, इमारत, प्लॉट, दुकान, शेतजमीन इत्यादीची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी खरेदी विक्री करता येते.

**क) अनुषंगिक कार्ये :**

प्रा. किन्ले यांच्या मते, आधुनिक काळात पैसा प्रत्येक आर्थिक व्यवहारात महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

१) **राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन :** राष्ट्रीय उत्पन्न हे पैशाच्या स्वरूपात मोजले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण उत्पादनाच्या चार घटकांमध्ये मौद्रीक मोबदल्याच्या स्वरूपात केले जाते. उदा. खंड, वेतन, व्याज, नफा इत्यादी.

२) **पतपैशाचा आधार :** व्यापारी बँका प्राथमिक ठेवींच्या आधारावर पतपैसा निर्माण करतात. पैसा हा पत निर्मितीसाठी रोखतेचा आधार आहे.

३) **संपत्तीचे रोखतेत रूपांतरण :** पैसा ही सर्वांत मोठी तरल संपत्ती आहे. ती कोणत्याही मालमत्तेत रूपांतरित करता येते आणि कोणतीही मालमत्ता पैशात रूपांतरीत करता येते. उदा. एखादी व्यक्ती सोने खरेदी करून परत विकू शकते त्यातून सरकारी कर्जरोखे खरेदी करू शकते.

४) **स्थूल आर्थिक चलांचे मापन :** स्थूल राष्ट्रीय उत्पादन(GNP), एकूण बचत, एकूण गुंतवणूक इत्यादींसारख्या स्थूल आर्थिक चलांची मोजदाद मौद्रीक चलनाच्या रूपात पैशामुळे करता येते. तसेच पैशामुळे शासकीय कर आकारणी व अर्थसंकल्प बांधणी करणे सोईचे होते.

**काळा पैसा संकल्पना :**

उत्पन्नावरील कर न भरल्याने काळ्या पैशाची निर्मिती होते. हा पैसा कायदेशीर, बेकायदेशीर पद्धतीने व कर चुकवेगिरी करून मिळवला जातो. काळ्या पैशामुळे भ्रष्टाचार, लाच, काळाबाजार, साठवणूक इत्यादीत वाढ होते. काळ्या पैशामुळे अशा बेकायदेशीर घडामोडींना चालना मिळते. त्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. काळ्या पैशामुळे आर्थिक, राजकीय व सामाजिक अस्थिरता निर्माण होते. काळ्या पैशावर नियंत्रण आणणाऱ्या विविध साधनांपैकी विमुद्रीकरण हे एक साधन आहे. जागतिक स्तरावर अनेक राष्ट्रांनी या मार्गाचा अवलंब केला आहे.

## स्वाध्याय

**प्र. १. सहसंबंध पूर्ण करा :**

१) पैशाचे प्राथमिक कार्य : विनिमयाचे साधन :: ______ : मूल्य हस्तांतरण

२) ______ : पतपैशाचा आधार :: पैशाची दुय्यम कार्ये : विलंबित देणी देण्याचे साधन

३) वस्तूपैसा : शंख-शिंपले :: ______ : क्रेडीट कार्ड

४) विभाज्यता : कमी मूल्यांमध्ये विभागणी :: ______ पैशाचे स्थलांतरण करणे सोपे होते

५) वस्तुविनिमय : वस्तू ::आधुनिक अर्थव्यवस्था : ______

**प्र. २. आर्थिक पारिभाषिक शब्द सांगा :**

१) वस्तूची वस्तूशी केलेली देवाणघेवाणीची क्रिया..........

२) भविष्यात परतफेड करण्याची तरतूद..........

३) अशी यंत्रणा ज्यामध्ये चलनाद्वारे फेड करण्याची सोय आहे..........

४) तारण या साधनाचा वापर करून खात्यावरील रकमेचे स्थानांतरण करता येते..........

५) पैशाचे मूल्य संगणकाच्या सहाय्याने हार्ड ड्राईव्ह किंवा सर्व्हर वर साठवता येणे व इलेक्ट्रॉनिकने स्थानांतरीत करता येणे..........

६) असा पैसा जो खाती जमा नाही व सरकारला ही याबाबत माहिती दिलेली नाही..........

**प्र. ३. योग्य पर्याय निवडा :**

**१) पैशाच्या उत्क्रांतीनुसार क्रम लावा.**

अ) धातू पैसा

आ) पशू पैसा

इ) धातूची नाणी

ई) वस्तू पैसा

**पर्याय :** १) अ, आ, इ, ई　　२) आ, ई, अ, इ

३) ई, इ, अ, आ　　४) इ, अ, आ, ई

**२) पैशाच्या उत्क्रांतीनुसार क्रम लावा.**

अ) प्लॅस्टिक पैसा

आ) कागदी पैसा

इ) इलेक्ट्रॉनिक पैसा

ई) पत पैसा

**पर्याय :** १) आ, ई, अ, इ　　२) अ, आ, इ, ई

३) ई, इ,आ, अ　　४) इ, आ, अ, ई

**प्र. ४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :**

१) वसंतशेट त्याच्या दुकानातील कोळसा शेतकऱ्यांना त्याच्या धान्यांच्या बदल्यात देतो.

२) बबनराव त्यांचे पैसे राष्ट्रीयकृत बँकेत ठेवतात.

३) चारूने तिच्या लहान भावासाठी डेबीट कार्ड वापरून शर्ट खरेदी केला.

४) मालतीने मध्यस्थामार्फत घर खरेदी केले. मध्यस्थाने तिच्याकडून मध्यस्थीचे पैसे रोख घेतले आणि त्याची पावती दिली नाही.

५) राष्ट्रीय चलनाचा अपव्यय/अयोग्य वापर टाळण्यासाठी काही वेळेस प्रचलित चलन प्रतिबंधित करण्यात येते.

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात की नाहीत ते सकारण स्पष्ट करा :**

१) वस्तूविनिमयात कोणत्याही अडचणी दिसून येत नाही.

२) आधुनिक चलनाची अनेक चांगली गुणधर्म दिसून येतात.

३) पैशाद्वारे अनेक कार्ये पूर्ण केली जातात.

४) पैसा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे कुठेही सहज स्थानांतरीत करता येतो.

**प्र. ६. दिलेल्या माहितीच्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

गणेश बसने मॉलला गेला. त्याने तिकिट काढण्यासाठी वाहकाला दहा रूपयांचे नाणे दिले. मॉल मधून त्याने अनेक वस्तू घेतल्या.

घेतलेल्या वस्तूंचे पैसे देण्यासाठी त्याने क्रेडिट कार्ड वापरले. परंतु पैसे घेणाऱ्या माणसाने त्याला आम्ही फक्त डेबिट कार्ड घेतो असे सांगितले. गणेशचे डेबिट कार्ड घरी राहिल्याने त्याने रोख पैशाने देयक भरले.

१) वरील व्यवहारात कोणकोणत्या प्रकारचे पैसे वापरले ते सांगा.

२) त्यापैकी कोणतेही दोन प्रकारचे पैसे स्पष्ट करा.

◈◈◈